# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

### मंगळवार, दिनांक ९ डिसेंबर, २०२५/ अग्रहायण १८, १९४७ (शके)

१२५. महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०२ (३) अन्वये मंगळवार, दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता **श्री.राजेश तारवी, सह सचिव (समिती) तथा विशेष कार्य अधिकारी यांच्या दालनात (कक्ष क्रमांक १०-अ, मुख्य इमारत, पहिला मजला, विधान भवन, नागपूर)** येथे संगणकीय आज्ञावलीद्वारे अशासकीय ठरावांचा प्राथम्यक्रम काढण्यात आला आहे. निदेशानुसार सदरहु ठराव **शुक्रवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी** खालीलप्रमाणे चर्चेला घेण्यात येणार आहेत :-

**(मंगळवार, दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजीच्या बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार खालील ठराव दाखविण्यात आले आहेत) —**

(१) **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ४६**

”मुंबई व उपनगरातील खाजगी विकासकांनी बांधलेल्या सदनिकांच्या किंमती सर्वसामान्याच्या आवाक्याबाहेर असल्याने म्हाडाने मुंबई व उपनगरातील नागरिकांसाठी मोठ्या प्रमाणावर सर्वसामान्य ग्राहकांना परवडतील अशा सदनिका बांधण्याचा कालबध्द कार्यक्रम शासनाने तातडीने हाती घ्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे”.

(२) **श्री.जयंत आसगावकर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ३२**

”राज्यातील विनाअनुदान तत्वावरील प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे”.

(3) **श्री. वसंत खंडेलवाल, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ५७**

”राज्यात तालुका स्तरावरील सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत जेणेकरून तालुक्याच्या ठिकाणी येणाऱ्या गावकऱ्यांना त्यांच्या कामासाठी वेगवेगळ्या कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही व आर्थिक भुर्दंड ही सोसावा लागणार नाही, यासाठी शासनाने योजनाबद्ध कार्यक्रमातून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे”

(४) **ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ३**

“राज्यातील पोलिसांना सतत २४ तास काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यावर दिवसेंदिवस कामाचा ताण वाढत आहे, तसेच पुरेशी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नसल्यामुळे अनेक पोलिसांना भाड्याच्या घरात राहावे लागत आहे, शासनाकडून देण्यात येत असलेल्या शासकीय निवासस्थानांची अत्यंत दुरावस्था झाली आहे, कामाचा ताण, गृहनिर्माणाचा प्रश्न यांमुळे पोलीस बांधवांत निर्माण होत असलेले तणावाचे व नैराश्याचे

..२/-

वातावरण, परिणामी त्यांच्यावरील मानसिक ताण वाढत आहे, पोलिसांच्या कार्यक्षमतेचा सर्वंकष विचार होवून त्यांच्या कामाचे तास, एक साप्ताहिक सुट्टी, निवासस्थाने इत्यादी मुलभूत समस्यांबाबत कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे".

**(५) श्री.राजेश राठोड, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक २४**

"बंजारा बोलीभाषेला राज्यभाषेचा दर्जा देण्याबाबत अनेकदा मागणी करण्यात आली आहे तसेच केंद्रशासनाच्या भाषेच्या सूचीमध्ये बंजारा भाषेचा समावेश करण्याबाबत राज्यशासनाने यापूर्वी शिफारस केली आहे, परंतू याबाबत केंद्र शासनाने अद्याप निर्णय घेतलेला नसल्याने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुन बंजारा बोलीभाषेला राज्यभाषेचा दर्जा देऊन केंद्र शासनाच्या भाषेच्या सूचीमध्ये बंजारा भाषेचा समावेश करण्याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा, अशी ही विधानपरिषद शासनास शिफारस करीत आहे".

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : ९ डिसेंबर, २०२५

**डॉ.विलास आठवले**
सचिव - ३
महाराष्ट्र विधानपरिषद

**<u>याची प्रत :-</u>**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सदस्य
२) मा.सभापती, विधानपरिषद यांचे सचिव
३) मा.उप सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) सचिव - १, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
५) सचिव - २, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
६) सचिव - ३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
७) सचिव - ४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी
९) प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग, विधान भवन, नागपूर
१०) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये
११) संगणक कक्ष (संकेतस्थळ)
१२) एम.के.सी.एल.कक्ष (आज्ञावली)